अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि. २५ नोव्हेंबर २०२३ | वर्ष : २२ वे | अंक : ५६ वा | किंमत : ५ रुपये | पाने ८

## भारताचा माजी खेळाडू श्रीसंतवर फसवणुकीचा गुन्हा

**केरळ** : भारताचा माजी वेगवान गोलंदाज एस श्रीसंत आणि वादाचे जुने नातं आहे. श्रीसंतने मैदानात आणि मैदानाबाहेरही अनेकदा वाद केले आहेत. त्यामुळे तो चर्चेतही आला.

केरळ पोलिसांनी एस श्रीसंतविरुद्ध गुन्हा दाखल केलेय. प्रसार माध्यमांच्या वृत्तांनुसार, एस श्रीसंत याच्यासह तीन जणांवर केरळ पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. एप्रिल २०१९ मधील हे प्रकरण आहे. कर्नाटकच्या कोल्लूरमध्ये एक स्पोर्ट्स अकादमी बनवण्यासाठी राजीव कुमार, एस श्रीसंत आणि वेंकटेश किनी यांनी एका तरुणाकडून १८ लाख रुपये घेतले होते. पण क्रिकेट अकादमीमध्ये त्या तरुणाला पार्टनर केले नाही. त्यामुळे तरुणाने आता पोलिसात धाव घेतली. त्या तरुणाचे नाव सरीश गोपालन असून तो चुंडा येथील रहिवासी आहे. सरीश म्हणाला की, स्पोर्ट्स अकादमी बनवण्यासाठी हा पैसा लावला होता. मलाही त्यामध्ये पार्टनर करतील, अशी मला आशा होती. पण मला पार्टनर केले नाही. त्यामुळे मी तक्रार दाखल केली आहे. दरम्यान,



सरीशच्या तक्रारीनंतर श्रीसंतसह तिघांविरुद्ध कलम ४२० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्रीसंतवर आयपीएल स्पॉट फिक्सिंगमुळे बंदीही घालण्यात आली, नंतर बंदी हटवण्यात आली. त्याने चित्रपटातही आपले नशीब अजमावले. पुन्हा क्रिकेटमध्येही उतरला. पण त्याच्या अडचणी कमी होत नाहीत. २००७ आणि २०११ च्या विश्वचषक विजेत्या संघाचा भाग राहिलेला एस श्रीसंत पुन्हा अडचणीत सापडला आहे.

# वन वसाहतीतून १५ लाखांची रोकड लंपास

**सुराज्य/सोलापूर**

'बडे-बडे शहरों में ऐसे छोटे-छोटे हादसे होते है' हे वाक्य हिंदी चित्रपटासाठी एक डायलॉग म्हणून शोभून दिसतो. मोठ्या शहरात घडलेल्या अनेक घटना छोट्या दिसू लागतात, त्याची व्याप्ती हे कारण असतं. सोलापुरातील विजापूर रस्त्यावर घडलेल्या चोरीच्या घटनेत चोरट्याने १५ लाख रुपयांची रोकड आणि १ लाख ६० हजारांचे सोन्याचे दागिने चोरून नेले. ही चोरी छोटी असो वा मोठी पोलिसांच्या नजरेत एक सारखीच असते.ही चोरी शासनाच्या नक्षत्रवन वन कर्मचाऱ्यांच्या वसाहतीत घडल्याने शासनाचे कर्मचारीही असुरक्षित असल्याचे पुढे आले आहे.



बडे शहर में छोटा हादसा, म्हणून गणलं जात असलेल्या चोरीच्या या घटनेत,विजापूर रस्त्यावरील नक्षत्रवन वन वसाहतीतील रहिवासी सिध्देश्वर कैलास सगरे (वय-३८ वर्षे) हे त्यांच्या राहत्या निवासस्थानाच्या मुख्य दरवाजाला आणि पाठीमागील दरवाजाला कुलूप लावून परगावी गेले होते.ही संधी साधत, अज्ञात चोरट्याने घराचे मागील दरवाजाचे कुलुप अज्ञात औजाराने तोडले.

त्यानंतर घरात प्रवेश केल्यावर कपाटामध्ये ठेवलेली १५ लाख रुपयांची रोकड आणि सोन्याचे दागिने चोरून नेले. सगरे कुटुंबीय गुरुवारी रात्री,घरी परत आल्यावर त्यांच्या घरी चोरट्याने पाठीमागील दरवाजाचे कुलूप तोडून १५ लाखाची रोकड,सरकारी किंमतीनुसार ९० हजार रुपयांच्या ४५ ग्रॅम वजनाच्या सोन्याचे पाटल्या आणि ७० हजार रुपये किमतीचे ३५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे नेकलेस चोरीस गेल्याचे निदर्शनास आले. याप्रकरणी सिध्देश्वर कैलास सगरे यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार विजापूर नाका पोलीस ठाण्याकडे अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.ही घटना 'बडे शहर में छोटा हादसा' आहे.पोलीस उपनिरीक्षक गायकवाड या गुन्ह्याचा अधिक तपास करीत आहेत.

### जुळे सोलापूर परिसरात बंद घरावर पाळत ठेवून चोऱ्या

सोलापूर शहराच्या अनेक भागांमध्ये विशेषतः जुळे सोलापूर परिसरात बंद असलेल्या घरावर पाळत ठेवून चोऱ्या झाल्याच्या अनेक घटना घडलेल्या आहेत. या घटना पोलीस दप्तरी आल्यावर तपासात काही गुन्हे उघडकीस येतात, ही नागरिकांसाठी जमेची बाब आहे, मात्र या चोरीच्या घटनेने शासकीय कर्मचाऱ्यांच्या वसाहतीही सुरक्षित नसल्याचे पुढे आले आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार; आरोपीला पाच वर्षे सक्तमजुरी

**सुराज्य/सोलापूर**

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी पाच वर्षे सक्तमजुरी, १ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

गणेश हेमंत जाधव (वय-२७, सेटलमेंट कॉलनी) असे शिक्षा झालेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत पिडीत अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांच्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. यातील पिडीत अल्पवयीन मुलगी ही जून २०१७ मध्ये उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी तिच्या नातेवाईकांच्या घरी गेली होती. त्यावेळी आरोपी गणेश जाधवने पिडीतेला त्याच्या घरामध्ये बोलावून मागच्या खोलीत नेऊन मोबाईलवर घाणेरडे व्हिडिओ दाखविले. तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. ही घटना कोणालाही न सांगण्याची धमकी दिली. पिडिता ही तिच्या घरी गेल्यानंतर सतत घाबरल्यासारखी रहात असल्यामुळे तिच्या आईने तिला विश्वासात घेऊन तिच्याकडे विचारपूस केली असता तिने तिच्यावर झालेल्या अत्याचाराबाबतची माहिती आई-वडिलांना सांगितली.



त्यानंतर पिडीतेच्या आईने चाईल्ड लाईन हेल्पलाईनच्या मदतीने सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. याचा तपास महिला पोलीस उपनिरीक्षक गंपले यांनी करून आरोपीस अटक केली. न्यायालयात दोषारोपपत्र पाठवून दिले. याची सुनावणी विशेष न्यायाधीश शिरभाते यांच्यासमोर झाली. यावेळी सरकारतर्फे ८ साक्षीदार तपासले. त्यामध्ये पिडिता, चाईल्ड हेल्पलाईनचे सदस्य यांची साक्ष महत्वाची ठरली. सरकारी वकिलांचा युक्तीवाद ग्राह्य धरून न्यायाधीश शिरभाते यांनी आरोपी गणेश जाधव यास पोक्सो कलम ९ प्रमाणे दोषी धरून पाच वर्षे सक्तमजुरी व १ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. दंड न भरल्यास तीन महिने साध्या कैदेची शिक्षा सुनावली. याप्रकरणी सरकारतर्फे ॲड.शीतल डोके यांनी तर आरोपीतर्फे ॲड. ईस्माईल शेख यांनी काम पाहिले.

### एकादशीला भाजी भाकरीऐवजी साबुदाण्याची खिचडी केली

## संतापलेल्या नातवाने आजीलाच संपवले

**बीड** : भाजी भाकरी का बनून देत नाही म्हणून नातवाने आजीची हत्या केल्याची धक्कादायक घटना बीडच्या माजलगाव तालुक्यातील नांदलगावमध्ये घडली आहे. नातवाला दिंद्रुड पोलिसांनी अटक केली आहे. कार्तिकी एकादशीनिमित्त घरामध्ये साबुदाण्याचा फराळ बनवण्यात आला होता. मात्र, नातवाने भाजी भाकरीचा हट्ट धरला आणि रागाच्या भरात आपल्या आजीचा खून केला

माजलगाव तालुक्यातल्या नांदलगाव या ठिकाणी कौशल्याबाई राऊत या आपल्या पतीसह आणि नातवासह राहत होत्या एकादशीच्या दिवशी त्यांनी घरात सर्वांसाठी साबुदाण्याचा फराळ केला होता. याच दरम्यान त्यांचा २९ वर्षाचा नातू राहुल बाळासाहेब राऊत हा जेवणासाठी घरी आला. यावेळी त्याने जेवणासाठी फराळ नको भाजी भाकरी का केली नाही असा जाब आजी कौशल्याबाई यांना विचारला. मला जेवणासाठी तात्काळ भाजी भाकरी बनवून देण्याचा हट्ट धरला. यावरूनच दोघांमध्ये वाद झाला आणि याच वादातून नातू राहुल याने आजी कौशल्या बाईच्या डोक्यात काठीने जबर मारहाण केली. यामध्ये त्यांच्या डोक्याला मोठी दुखापत झाली आणि जागेवरच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. खून करणाऱ्या राहुल राऊत याला अटक केली आहे.. एकादशीच्या दिवशी अगदी शुल्क कारणावरून कौशल्याबाई यांचा खून झाल्याने नांदल गावामध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.



### कुर्डुवाडीत व्यापारी संकुलाचे आरक्षण सोडत जाहीर

## गाळे वाटपात दिव्यांगावर अन्याय; तळमजल्यावर गाळा देण्याची गरज

**सुराज्य/कुर्डूवाडी**

कुर्डुवाडी नगरपालिका अंतर्गत बांधलेल्या नवीन व्यापारी गाळ्यांचे आरक्षण सोडत शुक्रवार, दि.२४ रोजी कै.काशिनाथ भिसे सभागृहात पार पडली. आरक्षण सोडत ही इन कॅमेरा इयत्ता तिसरीमधील जुबेर अस्लम मणेरी या विद्यार्थ्याच्या हस्ते चिठ्ठीद्वारे काढण्यात आली. अपंगांच्या गाळ्यांचे आरक्षण सोडत पहिल्या मजल्यावर निघाल्याने दिव्यांगावर अन्याय होणार आहे. वास्तविकतेत दिव्यांगाना गाळे हे तळमजल्यावर देण्याची गरज होती. मात्र तसे झाले नाही.

कुर्डुवाडी नगरपालिका अंतर्गत येणाऱ्या पंचायत समिती समोरील सिटी सर्व्हे नं. ६१२ ते ६१५ व सिटी सर्व्हे नं.६२७ येथे बांधलेल्या तळमजला आणि पहिल्या मजल्यावरील एकूण नवीन ५० गाळ्यांपैकी गाळा नं. १०, १२ आणि गाळा नंबर १६ हे दिव्यांसाठी आरक्षित झाले आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे शॉपिंग सेंटरमधील १० गाळ्यांपैकी दिव्यांगासाठी ५ टक्के याप्रमाणे १ गाळा हा पहिला मजला गाळा नं. ९ आरक्षित झाला आहे.सदर गाळ्यांची लिलाव प्रक्रिया लवकरच होणार असून, ऑनलाईन अर्ज दाखल करण्यासाठी लवकरच प्रसिद्धीकरण करण्यात येणार आहे, असे मुख्याधिकारी लक्ष्मण राठोड यांनी सांगितले.

यावेळी करनिरीक्षक सोनाली इंगळे, पाणी पुरवठा अभियंता कोमल वावरे, लेखापाल विनोद जोगदंड, रवींकांत मदने, राजू कदम, प्रवीण देवडकर उपस्थित होते.




व्यापारी गाळ्यांचे आरक्षण सोडत विद्यार्थ्याच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी लक्ष्मण राठोड आदी.

### दिव्यांगावर अन्यायच

कुर्डुवाडीतील व्यापारी संकुलातील गाळे हे दिव्यांगासाठी आरक्षित असून, सदरच्या दोन्ही ठिकाणचे गाळे पहिल्या मजल्यावर दिव्यांगासाठी आरक्षण सोडत निघाल्याने दिव्यांगाना वरच्या मजल्यावर ये-जा करण्यासाठी अनेक अडचणी येणार आहेत. त्यामुळे दिव्यांगावर हा एक प्रकारचा अन्यायच होणार आहे. यासाठी तळमजल्यावर त्यांचे आरक्षण काढण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

## जिल्हा न्यायालयातही आता 'व्हिडीओ कॉन्फरन्सिंग'

**नागपूर** : सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयातील 'डिजिटलायझेशन'ची प्रक्रिया वेगवान केल्यावर आता राज्यातील जिल्हा आणि तालुका न्यायालयांनाही अद्यावत करण्यात येत आहे. जिल्हा व तालुका न्यायालयात 'व्हिडीओ कॉन्फरन्सिंग'ची व्यवस्था करण्यात येणार आहे.

राज्यात यासाठी पाचशे सॉफ्टवेअर लायसेंस खरेदी करण्यात येतील. राज्य शासनाच्यावतीने यासाठी एक कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे. राज्याच्या विधी आणि न्याय विभागामार्फत याबाबतचे परिपत्रक जाहीर करण्यात आले. ई-कोर्ट प्रकल्पाच्या अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील जिल्हा न्यायालयांमध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची सुविधा देण्यासाठी राज्य शासनाला प्रस्ताव सादर केला होता. विधी आणि न्याय विभागाच्या २० ऑक्टोबरला झालेल्या बैठकीत या प्रस्तावाला मंजुरी प्रदान करण्यात आली. राज्य शासनाच्यावतीने एक कोटी दोन लाख ६६ हजार रुपये मंजूर करण्यात आले आहेत.



## राज्यात अवकाळी पावसाचा इशारा

**मुंबई** : राज्यातील वातावरणात चांगलाच बदल होत आहे. कुठे थंडीचा कडाका तर कुठं ढगाळ वातावरण दिसत आहे. दरम्यान, भारतीय हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पुढील पाच दिवस राज्यात अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर महाराष्ट्रात वादळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

## पुण्यात भर दिवसा बिल्डर नवऱ्याची बायकोने केली हत्या

### सहा वर्षांपूर्वी केला होता प्रेमविवाह

**सुराज्य/पुणे**

पुणे शहरातील वानवडी पोलीस ठाणे हद्दीतून एक खळबळजनक घटना उघडकीस आली. पत्नीने केलेल्या मारहाणीत बांधकाम व्यावसायिक असलेल्या पतीचा मृत्यू झाला. घरगुती भांडणातून वाद झाल्यानंतर पत्नीने पतीच्या तोंडावर ठोसा मारला. शुक्रवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास वानवडीतील एका उच्चभ्रू सोसायटीत हा प्रकार घडला. निखिल पुष्पराज खन्ना (वय ३६) असे खून झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. रेणुका निखिल खन्ना (वय ३८) यांना वानवडी पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

निखिल आणि रेणुका यांचा सहा वर्षांपूर्वी प्रेम विवाह झाला होता. दरम्यान दुपारच्या सुमारास दोघांमध्ये भांडण झाले. रागाच्या भरात पत्नी रेणुका हिने पतीच्या तोंडावर ठोसा मारला. त्यानंतर तिने फोन करून सासरे असलेल्या डॉक्टर खन्ना यांना याची माहिती दिली. डॉक्टर खन्ना घरी आले आणि त्यांनी निखिल यांना सीपीआर देण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना यश आले नाही आणि निखिल यांचा मृत्यू झाला होता. मयत निखिल हे पुण्यातील प्रसिद्ध बांधकाम व्यवसायिक आहेत. वानवडी परिसरातील एका उच्चभ्रू सोसायटीत आई-वडील पत्नी असे चार जण ते राहतात. दरम्यान घटनेची माहिती मिळाल्यानंतर वानवडी पोलिसांनी रेणुका खन्ना हिला ताब्यात घेतले आहे. अधिक तपास सुरू आहे.

पुण्यात मागील काही दिवसांपासून गुन्हेगारीचे प्रमाण वाढले आहे. त्यात कौटुंबिक हिंसाचारातदेखील वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. मागील काही दिवसांत पत्नीकडून पतीची हत्या केल्याच्या दोन घटना समोर आल्या आहे. पती दारु पीत असल्याने पत्नीने पतीचा खून केल्याची घटना घडली होती तर पत्नीने आपल्या बॉयफ्रेंडच्या साहय्याने पतीची हत्या केल्याची दुसरी घटना समोर आली होती.

### पत्नी मद्यप्राशन करुन होती?

रागाच्या भरात रेणुका यांनी निखिल यांच्या नाकावर जोरात ठोसा लगावला. त्यामुळे त्यांच्या नाकाचे आणि तोंडाचे हाड फ्रॅक्चर झाले. त्यातच मोठा रक्तस्त्राव झाल्याने ते बेशुद्ध पडले त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. पोलिसांनी त्यांच्या पत्नीला ताब्यात घेतले आहे. पत्नी मद्यप्राशन करुन असल्याचा संशय पोलिसांना आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'असे' फायनलला खेळायला काय झालं होतं ?

कल्याण
257-48-260

मुंबई
116-83-337

# उजनी परीक्षेत्रात विदेशी पाहुण्यांच्या आगमनाची लगबग सुरु

**सुराज्य/टेंभुर्णी**

परदेशी पक्षांची पंढरी ठरलेल्या उजनी धरणाच्या विस्तृत पाणफुगवठ्यावर ऋतुमानातील बदलानंतर आता विदेशी पाहुणे पक्षांच्या आगमनाला प्रारंभ झाल्याची माहिती पक्षी अभ्यासाकांकडून मिळाली आहे.

सोलापूर शहरासह जिल्ह्यातील नागरिकांची तहान भागवणारे उजनी धरण हे चाळीस वर्षांपूर्वी निर्माण होऊन नानाविध देशी विदेशी पक्षांचे आश्रयस्थान म्हणून नावारूपाला आले आहे. दरवर्षी हिवाळ्यात व उन्हाळ्यात धरण परिसरात स्थलांतरित पक्ष्यांचा मोठा वावर या ठिकाणी पाहायला मिळतो. याही वर्षी उशीरा का होईना धरणपरिसरात गेली काही दिवसापासून स्थानिक पक्ष्यांबरोबर हंगामी पक्षीही येऊन दाखल होत असल्याचे चित्र दिसत आहे. ज्येष्ठ पक्षी अभ्यासक डॉ. अरविंद कुंभार यांनी नुकतेच धरण परिसरातील पाणलोट क्षेत्रात पक्ष्यांचे सर्वेक्षण करून ही माहिती दिली. यंदा परतीच्या प्रवासाला लागलेला पावसाने जोरदार बरसल्याने उजनी धरण काटोकाठ भरलेली आहे. स्थलांतरित पक्ष्यांचा चराऊ भाग पाण्याने आच्छादित झाल्याने शिवाय वातावरणातील अस्थिरतेमुळे नेहमी वेळेवर येणारे स्थलांतरित पक्षी यावर्षी उशिराने आगमन करत आहेत.

उजनी काठावर पक्षांचा वावर सध्या तरी अत्यल्प प्रमाणात आहे. मात्र मत्स्याहरी बदके व शिकारी पक्षांचा वावर मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. दरम्यानच्या काळात जिल्ह्यातील पाणवठे पण कोरडे पडतील. जानेवार व फेब्रुवारीदरम्यान उजनी धरण परिसरात विविध पक्षांनी गर्दीने फुलून जाईल.



### रोहितांच्या आगमनाची प्रतिक्षा

उजनी धरण परिसरात येणाऱ्या स्थलांतरित पक्षांपैकी रोहित अर्थात फ्लेमिंगो हा नजाकदार पक्षी पर्यटकांना नेहमी मोहात टाकतात. हे पक्षी दरवर्षी उजनीच्या पाणलोट क्षेत्रात कमोठ्या समूहाने येऊन पुढच्या तीनचार महिनांकरीता वास्तव्याला राहतात. यावर्षी ऋतुचक्रात बिघाड झाल्यामुळे हे पक्षी आपले प्रवास लांबणीवर टाकलेले आहेत.



**मत्स्याहारी पक्षी दाखल :** गेल्या आठवड्यात समुद्र पक्षी (ही गल्स), चक्रवाक बदक (रूढी शेल्डक), परी बदक (नॉर्दर्न शॉवलर), सोनुला बदक (कॉमन टील), शेंद्री बाड्डा (पोचार्ड), मत्स्यघार (ऑस्प्रे) आदी मत्स्याहारी पक्षी येऊन दाखल झाले आहेत. धरणाच्या काठावरील चिखलात आपली लांब चिमट्यासारखी चोच खुपसून जलक्रिमींना लक्ष्य करणारे टिलवा (स्टिंट), तुतुवार(सँड पाइपर), पाणटिवळा (गॉडविट) इत्यादी 'वेडर पक्षी' आपली हजेरी लावली आहेत. जलाशयपरिसरातील उघड्या भूभागावरील गवताळ प्रदेशात विविध ससाणे (फाल्कन), भोवत्या (हॅरिअर), ठिपक्यांचा गरूड (स्पॉटेड ईगल), मधुबाज हनी बझर्ड आदी शिकारी पक्षीही येऊन दाखल झाले आहेत.

### स्थलांतरित पक्ष्यांसांठी उजनी पोषक...

१९७० च्या दशकात साकारलेल्या उजनी धरणातील पाणीसाठा सुमारे दहा किलोमीटर रुंद व दीडशे किलोमीटर लांब क्षेत्रात पसरला आहे. धरणाच्या काठावर विविध प्रजातींची झाडे झुडपे आहेत; शिवाय पाणलोट क्षेत्रात ऊस, केळी, पंपई, पेरू, चिक्कू व इतर फळबागा बहरलेले असतात. या कारणांमुळे स्थलांतरित पक्ष्यांसाठी सुरक्षित सुरक्षित आश्रय व मुबलक खाद्य मिळतो. जलाशयात वर्षभर मत्स्य व्यवसाय चालत असल्यामुळे अनेक मत्स्याहारी पक्ष्यांना मासे उपलब्ध होतात. दलदल भागातील चिखल प्रदेशात तसेच पाणपृष्ठावर वाढणारी शेवाळ, जलकीटक शिंपले - गोगलगाय सारखे मृदुकाय, प्राणी बेडूक व त्यांची पिल्ले, खेकडे इत्यादी पक्ष्यांचे खाद्यान्न विपुल प्रमाणात उपलब्ध होत असल्यामुळे धरण परिसरात मुक्त विहार करण्याच्या विहंगांना पंचपक्वान्नच मिळते.